SAMPLE CONTENT

PERFECT

# मराठी अक्षरभारती

BASED ON TEXTBOOK AND BOARD PAPER PATTERN




सौ. अनिता म्हात्रे
M.A. B.Ed.

प्राची शेंडे
M.Com., C.A.

सावली म्हात्रे
M.A., D.T.Ed.


STD. X
(Eng. Med.)


Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे – ०४
यांच्याद्वारे नियोजित अद्ययावत कृतिपत्रिका आराखड्यावर आधारित

PERFECT

# मराठी अक्षरभारती

## इयत्ता दहावी (English Medium)

### ठळक वैशिष्ट्ये

- अद्ययावत कृतिपत्रिका प्रारूपावर आधारित.
- सहज, सोपी लेखनशैली व सुटसुटीत मांडणी.
- आदर्श उत्तरांसहित सरावासाठी भरपूर कृती.
- प्रत्येक पाठाखाली भाषाभ्यास विभागाच्या सरावासाठी भरपूर कृती.
- उपयोजित लेखनावर आधारित वैविध्यपूर्ण कृतींचा अंतर्भाव.
- सखोल अभ्यासासाठी स्वतंत्र व्याकरण विभाग अंतर्भूत.
- हसतखेळत अभ्यासासाठी 'गंमत जंमत' कृती अंतर्भूत.
- कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज व पाठ्यपुस्तकातील उपक्रमांची उत्तरे Q. R. Code द्वारे समाविष्ट.
- मार्च २०२२ पर्यंतच्या बोर्ड कृतिपत्रिकांमधील निवडक प्रश्नांचा उत्तरांसहित समावेश.
- नमुना कृतिपत्रिका आणि मार्च 2023 ची बोर्डाची कृतिपत्रिका समाविष्ट. (Q. R. Code द्वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.)

Sample Content

Printed at: **Print to Print,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022

**TEID: 2500**

P.O. No. 7088

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा टप्पा! या टप्प्यावर शासनाने पारंपरिक शिक्षण पद्धतीत परिवर्तन साधत ज्ञानरचनावादावर आधारित अभ्यासक्रम योजला आहे. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमधील भाषिक कौशल्यांचा विकास घडवणारा तर आहेच, शिवाय विद्यार्थ्यांना भाषेचा लळा लावणारा व भाषेच्या बळावर त्यांच्यातील आकलनशक्ती, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता या गुणांचा विकास करणारा आहे. जीवनाला कलाटणी देणारा हा टप्पा सहज व सुरळीत पार व्हावा अशी साहजिकच प्रत्येक विद्यार्थ्याची इच्छा असते. हीच इच्छा लक्षात घेऊन व सुधारित मूल्यमापन आराखड्याचा सखोल अभ्यास करून **टार्गेट प्रकाशनाचे PERFECT मराठी अक्षरभारती : इयत्ता दहावी** या पुस्तकाची निर्मिती करण्यात आली आहे. हे पुस्तक विद्यार्थी व अभ्यासक्रम यांदरम्यानचा सेतू बनून महत्त्वपूर्ण भूमिका निभावण्यास सक्षम आहे.

या पुस्तकामुळे विद्यार्थ्यांमधील भाषिक क्षमतांचा विकास होऊन त्यांना भाषेचा आस्वाद घेणे सहज सोपे होईल. विद्यार्थ्यांमधील तार्किक शक्ती, त्यांच्यात दडलेली प्रतिभाशक्ती यांना वाट मोकळी करून देण्यास निश्चितच हे पुस्तक उपयुक्त ठरेल. पुस्तकाची विविध प्रकारची वैशिष्ट्ये पुढील काही पृष्ठांवर विस्तारित स्वरूपात देण्यात आली आहेत. हे पुस्तक विद्यार्थी व शिक्षकांकरता उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरेल अशी आम्हांला खात्री आहे.

प्रयत्नांती परमेश्वर. चला, नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया. तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इ-मेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती :** तृतीय

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on 'मराठी अक्षरभारती; चौथे पुनर्मुद्रण: २०२२' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# KEY FEATURES

***Latest Board Paper Pattern*:** The Latest Board Paper Pattern prescribed by the State Board has been provided so that the students can get acquainted with the question types, marking scheme, options, word limits etc.

***Central idea of Chapter / Poems:*** The summary of all chapters and poems has been provided for quick understanding of the central idea of the chapter/poem.

***Glossary:*** A Glossary containing the meanings of all the difficult words and phrases from the chapter has been provided. For the convenience of the students these words have been arranged alphabetically.

***Notes:*** Notes providing explanation of the difficult concepts in lucid language have been given. These notes have been arranged alphabetically.

***Segregation of chapters into extracts*:** For better understanding all the chapters have been segregated into extracts with ample activities based on them in accordance with the Board Paper Pattern

***Integrated Questions:*** The textual questions requiring holistic answers have been covered under this header in each chapter.

***Grammar and Language Study*:** For ensuring ample practice, we have provided this special section at the end of each chapter, which extensively covers all the Grammar and language study activities.

***Solved Board Questions:*** The question asked in March and July 2019 and March and December 2020 and March 2022 Board examinations have been incorporated along with the answers.

***Project / Paraphrase of Poem*:** Wherever required, the answers of the Textual Projects have been provided through Q. R. Codes. This will provide guidance to the students for solving the projects. / For greater clarity and insights to the poem the videos of paraphrase have been provided through Q. R. Codes at the end of each poem.

***Unseen Passages:*** A separate section with plenty of Unseen passages along with activities based on them has been provided to ensure substantial practice

***Dedicated Grammar Section*:** For thorough understanding of grammar a dedicated section on Grammar has been provided. This section covers explanation of the concepts and ample examples with practice questions based on 'वाक्यांचे प्रकार, वाक्यरूपांतर, लेखननियम, विरामचिन्हे'.

***Writing Skills:*** This section towards the end of the book includes all the writing skills activities prescribed for the students, with the explanation of concepts in lucid language. It contains chapters on. 'पत्रलेखन, सारांशलेखन, जाहिरातलेखन, बातमीलेखन, कथालेखन, लेखनकौशल्य'

***Interesting Facts / Fun activity*:** Some of the chapters include small boxes under the title 'थोडासा विरंगुळा'/ 'गमंत जंमत' giving interesting facts and activities about the language.

***Internal Assessment:*** The break-up of the 20 Marks for internal assessment, weightage allotted to different skills and guidelines for the same have been provided.

***Model Activity Sheet and Board Activity Sheet*:** Model Activity Sheet and Board Activity Sheet 2023 have been provided. (Solutions in pdf format through Q.R. Code)

Sample Content

**मराठी अक्षरभारती**

**कृतिपत्रिका आराखडा**

**वेळ : ३ तास** **एकूण गुण : ८०**

| **विभाग १ : गद्य** | **एकूण गुण १८** |
|---|---|

(अ) **१ पठित उतारा – ७ गुण**
(आ) **१ पठित उतारा – ७ गुण** } १३० ते १५०
(इ) **१ अपठित उतारा – ४ गुण** – ८० ते १०० शब्द

**(अ) आणि (आ) – ०७ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी –**

| | | |
|---|---|---|
| (१) | आकलन कृती – | २ गुण |
| (२) | आकलन कृती – | २ गुण |
| (३) | स्वमत – | ३ गुण |

**(इ) ४ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी –**

| | | |
|---|---|---|
| (अ) | आकलन कृती – | २ गुण |
| (आ) | आकलन कृती – | २ गुण |

| **विभाग २ : पद्य** | **एकूण गुण १६** |
|---|---|

(अ) **१ पठित पद्य – ८ गुण**
(आ) **१ पठित पद्य – ८ गुण**

**(अ) ८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी –**

| | | |
|---|---|---|
| (१) | आकलन कृती | २ गुण |
| (२) | आकलन कृती | २ गुण |
| (३) | कवितेतील शब्दांचा अर्थ लिहिणे (चार शब्द देणे) | २ गुण |
| (४) | काव्यसौंदर्य | २ गुण |

**(आ) ८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी –**

दिलेल्या २ कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी पुढील मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवणे अपेक्षित. (सहापैकी पाच कृती देणे व पाचही सोडवणे)

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री. | १ गुण |
| (२) | प्रस्तुत कवितेचा विषय. | १ गुण |
| (३) | प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहिणे | २ गुण |
| (४) | प्रस्तुत कवितेतून मिळणारा संदेश लिहा. | २ गुण |
| (५) | प्रस्तुत कविता तुम्हांला आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण लिहा. | २ गुण |
| (६) | प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहिणे (चार शब्द देणे) | २ गुण |

| **विभाग ३ : स्थूलवाचन** | **एकूण गुण ६** |
|---|---|

प्रत्येकी ३ गुणांच्या २ कृती
(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित ३ कृती देणे व त्यांपैकी २ सोडवणे अपेक्षित)

| **विभाग ४ : भाषाभ्यास** | **एकूण गुण १६** |
|---|---|

(अ) **व्याकरण घटकांवर आधारित कृती** **८ गुण**

(१) **वाक्यप्रकार** २ गुण
विधानार्थी, प्रश्नार्थी, उद्गारार्थी, आज्ञार्थी वाक्य ओळखणे.

Sample Content

(२) **वाक्य रूपांतर** २ गुण

i. प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
ii. उद्गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
iii. आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर
iv. होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर

(३) **वाक्प्रचार** (३ देणे व त्यांपैकी २ लिहिणे अपेक्षित) ४ गुण

(खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करणे.)
(प्रत्येकी १ गुण अर्थासाठी व १ गुण वाक्यात उपयोगासाठी)

(आ) **भाषिक घटकांवर आधारित कृती** **८ गुण**

(१) **शब्दसंपत्ती** – ४ गुण

i. समानार्थी शब्द
ii. विरुद्धार्थी शब्द
iii. शब्दसमूहांबद्दल एक शब्द लिहिणे
iv. एकवचन – अनेकवचन
v. लिंग बदलणे

} यांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १-१ गुणांच्या ४ कृती विचारणे अपेक्षित

(२) **लेखननियमांनुसार लेखन** – २ गुण

अचूक शब्द ओळखा – (कोणतेही दोन शब्द-प्रत्येकी ४ पर्यायांसह देणे. चार पर्यायांपैकी १ शब्द अचूक देणे)

**किंवा**

दोन वाक्य देणे. (प्रत्येक वाक्यात लेखननियमांनुसार दोन चुकीचे शब्द देणे, ते शब्द दुरुस्त करून लिहिणे अपेक्षित)

(३) **विरामचिन्हे** २ गुण

योग्य विरामचिन्हे वापरा किंवा विरामचिन्हे ओळखा.

## विभाग ५ : उपयोजित लेखन — एकूण गुण २४

(अ) **पत्रलेखन**

औपचारिक किंवा अनौपचारिक ६ गुण

**मागणी/ विनंती** **अभिनंदन**

**किंवा**

**अपठित गद्य उताऱ्याचे सारांशलेखन.**

**(विभाग – १ गद्य (प्र. क्र. १ (इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा १/३ सारांश लिहिणे)**

(आ) १० गुण

(१) **जाहिरात लेखन** (५० ते ६० शब्द)
(२) **बातमी लेखन** (५० ते ६० शब्द)
(३) **कथालेखन** (८० ते ९० शब्द)

} तिन्ही देणे त्यांपैकी २ लिहिणे अपेक्षित (प्रत्येकी ०५ गुण)

(ई) **लेखनकौशल्य** (१०० ते १२० शब्द) ८ गुण

(१) प्रसंगलेखन
(२) आत्मकथन
(३) वैचारिक लेखन

} तीनपैकी १ लिहिणे अपेक्षित

Sample Content

# अक्षरभारती गुणविभागणी

| घटकनिहाय गुणविभागणी | | | |
|---|---|---|---|
| अनु. क्र | घटक | गुण | विकल्प गुण |
| १ | गद्य | १८ गुण | |
| २ | पद्य | १६ गुण | ८ गुण |
| ३ | स्थूलवाचन | ०६ गुण | ३ गुण |
| ४ | भाषाभ्यास | १६ गुण | २ गुण |
| ५ | उपयोजित लेखन | २४ गुण | ३३ गुण |
| | एकूण गुण | ८० गुण | ४६ गुण |

**अंतर्गत मूल्यमापन – २० गुण**

| | | |
|---|---|---|
| अ. | श्रवण कौशल्य | ०५ गुण |
| आ. | भाषण कौशल्य | ०५ गुण |
| इ. | स्वाध्याय | १० गुण |

*याशिवाय भाषिक घटकांवर आधारित कृतींमध्ये विचारण्यात येणाऱ्या कृतींनुसार काही विकल्प गुण आहेत.

[महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे - ०४]

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | कवी/कवयित्री/लेखक/लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | तू बुद्धी दे (प्रार्थना) | गुरू ठाकूर | १ |
| २. | संतवाणी | | |
| | अ. अंकिला मी दास तुझा | संत नामदेव | ३ |
| | आ. योगी सर्वकाळ सुखदाता | संत एकनाथ | ८ |
| ३. | शाल | रा. ग. जाधव | १४ |
| ४. | उपास | पु.ल.देशपांडे | २१ |
| • | मोठे होत असलेल्या मुलांनो... (स्थूलवाचन) | डॉ. अनिल काकोडकर | ३६ |
| ५. | दोन दिवस (कविता) | नारायण सुर्वे | ४० |
| ६. | चुडीवाला | जयश्री रुईकर | ४६ |
| ७. | फूटप्रिन्ट्स | डॉ. प्रदीप आवटे | ५५ |
| ८. | ऊर्जाशक्तीचा जागर | डॉ. रघुनाथ माशेलकर | ६४ |
| • | जाता अस्ताला (स्थूलवाचन) | गुरुदेव रवींद्रनाथ टागोर | ७२ |
| ९. | औक्षण (कविता) | इंदिरा संत | ७६ |
| १०. | रंग साहित्याचे | | ८१ |
| ११. | जंगल डायरी | अतुल धामनकर | ९२ |
| १२. | रंग मजेचे रंग उद्याचे (कविता) | अंजली कुलकर्णी | १०२ |
| • | जगणं कॅक्टसचं (स्थूलवाचन) | वसंत शिरवाडकर | १०७ |
| १३. | हिरवंगार झाडासारखं (कविता) | जॉर्ज लोपीस | १११ |
| १४. | बीज पेरले गेले | चंदू बोर्डे | ११७ |
| १५. | खरा नागरिक | सुहास बारटक्के | १२६ |
| १६. | स्वप्न करू साकार (कविता) | किशोर पाठक | १३५ |
| • | व्युत्पत्ती कोश (स्थूलवाचन) | | १४० |
| • | अपठित गद्य आकलन | | १४३ |
| | **व्याकरण विभाग** | | १४८ |
| | **उपयोजित लेखन** | | |
| १. | पत्रलेखन | | १५७ |
| २. | सारांशलेखन | | १७० |
| ३. | जाहिरात लेखन | | १७३ |
| ४. | बातमीलेखन | | १७८ |
| ५. | कथालेखन | | १८२ |
| ६. | लेखन कौशल्य | | १८६ |
| • | तोंडी परीक्षेविषयी महत्त्वाची माहिती | | १९८ |
| • | नमुना कृतिपत्रिका (Q. R. Code द्वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.) | | १९९ |
| • | बोर्ड कृतिपत्रिका : मार्च 2023 (Q. R. Code द्वारा उत्तरपत्रिका उपलब्ध.) | | २०५ |


**[टीप : पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत. ]**

सुधारित कृतिपत्रिका आराखड्यानुसार अभ्यासाला नसलेले पाठ्यपुस्तकातील अभ्यासघटक / प्रश्नप्रकार या पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेले नाहीत. **उदा.** काव्यपंक्तींचे रसग्रहण, समास, अलंकार इत्यादी.

Sample content

Practicing model papers is the best way to self-assess your preparation for the exam Scan the adjacent QR Code to know more about our **"SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions**."

Going through the entire book in the last minute seems to be a daunting task?
Go for our **"Important Question Bank (IQB)"** books for quickly revising important questions
Scan the adjacent QR Code to know more.

Don't lose out on marks in Grammar & Writing Skills
Practice more & score full with Target's "**व्याकरण - भाषाभ्यास व उपयोजित लेखन**" Scan the adjacent QR Code and go for it now.

Scan the adjacent QR Code to know more about our **"Board Questions with Solutions"** book for Std. X and Learn about the types of questions that are asked in the X Board Examination.

Sample Content

# ३ शाल

– रा. ग. जाधव

## पाठाची पार्श्वभूमी

सदर पाठ 'छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक २०१२' यातून घेतलेला आहे. प्रस्तुत पाठात निर्जीव वस्तूशी निगडित असलेल्या आठवणी माणसाच्या भावना तरल ठेवतात हे शालीच्या प्रतीकातून लेखकाने सांगितले आहे. 'शालीमुळे येणारी शालीनता' हा संदर्भ अंतर्मुख करणारा आहे. पाठात उदारपणाचे आलेले उदाहरण मानवाची संवेदनशीलता जपणारे आहे.

## शब्दार्थ

| | |
|---|---|
| अध्यक्ष | (president) |
| अभागी | भाग्यहीन, वंचित (unfortunate) |
| अशक्त | शक्ती नसलेला (weak) |
| अहोरात्र | दिवस-रात्र (day and night) |
| उपरोधिक | उपहासिक, विरुद्ध अर्थाने बोलून अपेक्षित परिणाम साधू पाहणे (sarcastic) |
| उसंत | मोकळा वेळ (leisure) |
| ऊब | उष्णता, सुख, आधार (warmth) |
| कर्जबाजारी | खूप कर्ज असलेला (bankrupt) |
| खोच | लपलेला, तिरकस अर्थ (the hidden meaning) |
| गाठोडे | (bundle) |
| चिरगुटे | चिंधी (rags) |
| चिंचोळा | निमुळता, अरुंद होणारा (narrow) |
| तट | काठ, किनारा (river bank) |
| तत्कालीन | त्यावेळचे, त्या काळातील (at that time) |
| दीनवाणे | केविलवाणे, करुणा उत्पन्न करणारे (pitiable) |
| निकटवर्ती | जवळचे (close) |
| निमित्त | कारण (purpose) |
| प्रवाह | पाण्याच्या किंवा वायूच्या वाहण्याची गती (flow) |
| बिकट | कठीण, अवघड (difficult, full of hardships) |
| भरती | येथे अर्थ - खूप गर्दी (high tides, here huge audience) |
| भिक्षेकरी | भिकारी, भिक्षुक (beggar) |
| वर्षाव | भडिमार (shower) |
| शाल | लोकरीचे उंची वस्त्र (shawl) |
| शालीनता | सभ्यता, विनय (humility) |
| श्रमिक | कष्टाची कामे करणारे (labourers) |
| श्रीफळ | नारळ (coconut, fruit of prosperity) |
| सन्मान | सत्कार, आदर, गौरव (felicitation) |
| सुटकेस | कपडे ठेवण्याची पेटी (suitcase) |
| क्षीण | कमी (weak) |

## वाक्प्रचार व त्यांचे अर्थ

| | |
|---|---|
| उसंत न लाभणे. | वेळ न मिळणे. (unable to take out time for something) |
| एका पायावर हो म्हणणे. | एखाद्या गोष्टीसाठी लगेच होकार देणे. (to agree readily ) |
| चक्कर मारणे. | फेरी मारणे. (to take a stroll) |
| ताब्यात घेणे. | कब्जात घेणे. (to take into one's custody) |
| भिकेला लागणे. | दारिद्र्य येणे.( to be poor) |

## टिपा

| | |
|---|---|
| नारायण सुर्वे | मराठी भाषेतील सुप्रसिद्ध कवी व साहित्यिक. |
| पु. ल. देशपांडे | महाराष्ट्राचे लाडके अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. लेखक, नाटककार, अभिनेता, पटकथाकार, दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक म्हणून लोकप्रिय. |
| प्राज्ञ पाठशाला | इ. स. १९०१ पासून सुरू असलेली वाई येथील वैदिक शिक्षण देणारी शाळा. |
| मराठी साहित्य संमेलन | मराठी ग्रंथकारांना एकत्र आणण्याच्या व ग्रंथ प्रसाराला चालना मिळण्याच्या हेतूने दरवर्षी घेतले जाणारे संमेलन. |
| वाई | महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील एक प्रसिद्ध शहर आहे. येथे मराठी विश्वकोश मंडळाचे कार्यालय आहे. |
| विश्वकोश | 'अ' ते 'ज्ञ' पर्यंतच्या महत्त्वाच्या संज्ञांची सामान्य माणसाला मराठीत ओळख व्हावी या हेतूने महाराष्ट्र शासनातर्फे तयार केला गेलेला, ज्ञानाचे भांडार असलेला ग्रंथ. |
| सुनीता देशपांडे | मराठी लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. पु. ल. देशपांडे यांच्या पत्नी. |

Sample Content

## परिच्छेद १

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i. [ ] ← **यांच्याकडून शाल मिळणे हा लेखकासाठी गौरव होता** → [ ]

**उत्तर :** १. पु. ल. देशपांडे   २. सुनीताबाई देशपांडे

ii. [ ] ← **लेखकाने मासे पकडणाऱ्या बाईला देऊ केलेल्या गोष्टी** → [ ]

**उत्तर :** १. ‘पुलकित’ शाल   २. पाचपन्नास रुपये

**२. उत्तरे लिहा.**

*i. पु. ल. व सुनीताबाई यांनी दिलेल्या शालीचा लेखकाने पाठात केलेला उल्लेख –

*ii. पाठात उल्लेख असणारी नदी –

**किंवा**

उताऱ्यात आलेले नदीचे नाव **[मार्च २०२२]**–

iii. नदीकाठच्या शाळेचे नाव –

iv. बाळाची आई करत असलेला उद्योग **[मार्च २०२२]**–

**उत्तर :** i. पुलकित   ii. कृष्णा
iii. प्राज्ञ पाठशाला   iv. मासेमारी

**३. वैशिष्ट्ये लिहा.** **[मार्च २०१९]**

i. कृष्णा नदीचा प्रवाह-
ii. टोपलीत ठेवलेले मूल-
iii. लेखकाने सुटकेसमधून काढलेली शाल-

**उत्तर :** i. चिंचोळा
ii. छोटे, थंडीने कुडकुडून रडणारे
iii. पुलकित

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ६**
[एकदा मी पु.ल. देशपांडे ................
................ उबेपेक्षा अधिक होती.]

### कृती २ – आकलन

***१. ‘पुलकित’ हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**

**उत्तर :** लेखकाने सुटकेसमधील काढलेली शाल कशी होती?

***२. खालील प्रसंगी लेखकाने केलेली कृती लिहा.**
**एका बाईचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत होते.**

**उत्तर :** लेखकाने हे दृश्य पाहून न राहावून स्वत:च्या सुटकेसमधील पु. लं. नी दिलेली शाल व त्यासोबत काही पैसे खिडकीतून त्या बाईला देऊ केले.

***३. खालील वाक्यातील कृतीतून किंवा विचारांतून कळणारे लेखकाचे गुण शोधा.**
**बाईला हाक मारून खिडकीतून शाल व नोटा दिल्या.**

**उत्तर :** औदार्य, संवेदनशील मन, माणुसकी

***४. कारणे शोधून लिहा.**
**एका बाईच्या बाळासाठी शाल दिल्याच्या घटनेची ऊब पुलकित शालीच्या उबेपेक्षा जास्त होती, कारण...**

**उत्तर :** बॅगेत फक्त पडून राहिलेल्या शालीचा उपयोग थंडीने कुडकुडणाऱ्या एका गरजूला थंडीपासून वाचवण्यासाठी झाला होता.

**५. एका वाक्यात उत्तर लिहा.**

**i. लेखक वाईला कशासाठी गेले होते?**

**उत्तर :** लेखक वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून गेले होते.

**ii. पाचपन्नास रुपयांच्या नोटा लेखकाने मासे पकडणाऱ्या बाईला का दिल्या असाव्यात? [मार्च २०१९]**

**उत्तर :** त्या बाईकडे बाळाचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी पुरेसे कपडे नव्हते व त्याच्याकडे लक्ष द्यायला फुरसतही नव्हती, म्हणून त्या बाईला मदत करण्यासाठी लेखकाने तिला पाचपन्नास रुपयांच्या नोटा दिल्या असाव्यात.

### कृती ३ – स्वमत

***१. लेखकाच्या भावना जशा ‘शाल’ या वस्तूशी निगडित आहेत, तशा तुमच्या आवडीच्या वस्तूशी निगडित असलेल्या भावना, तुमच्या शब्दांत लिहा.**

**उत्तर :** मी इयत्ता सहावीत असतानाची गोष्ट. वक्तृत्व स्पर्धेत पहिला आलो, म्हणून आजी-आजोबांनी मला सायकल घेऊन दिली. मला खूपच आनंद झाला होता. आठ दिवसांतच मी सायकल चालवायला शिकलो आणि तेव्हापासून ती माझी सोबतीच झाली. शाळेत, मैदानावर कुठेही जाताना मी माझ्या सायकलशिवाय जाऊच शकत नाही, इतकं माझं तिच्याशी घट्ट नातं जुळलं आहे. आजी आजोबांचे प्रेम, मित्रांसोबत सायकलवरून केलेल्या सहली, धम्माल-मस्ती अशा अनेक आठवणी या सायकलशी जोडल्या गेल्या आहेत. या आठवणी मला नेहमी आनंद देतात, म्हणूनच मी जिव्हाळ्याने तिची काळजी घेतो, देखभालही करतो. अशी ही सायकल माझ्यासाठी फक्त एक वस्तू नाही, तर हक्काची, जीवाभावाची मैत्रीणच झाली आहे.

Sample Content

## परिच्छेद २

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

i. **कार्यक्रमात नारायण सुर्वे यांना सन्मानाने मिळणाऱ्या वस्तू** → ☐ ☐

[मार्च २०२२]

**उत्तर :** १. शाल    २. श्रीफळ

ii. **शालींच्या वर्षावांनंतरही नारायण सुर्वेंवर न झालेले परिणाम** → ☐ ☐

**उत्तर :** १. त्यांची शालीनता कधी हरवली नाही.
२. त्यांची शालीनता कधी क्षीणही झाली नाही.

**२. उत्तरे लिहा.**

*i. सभासंमेलने गाजवणारे कवी –
ii. शालीमुळे शालीनता येणार असेल, तर कर्जबाजारी होऊन शेकडो शाली खरेदी करून गरजूंना देईन असे म्हणणारे –
iii. सुर्वेंचा मूळ स्वभाव –

**उत्तर :** i. कविवर्य नारायण सुर्वे    ii. लेखक
iii. शालीन

**३. वैशिष्ट्य लिहा.** [मार्च २०१९]
**कविवर्य नारायण सुर्वे यांचे कार्यक्रम**

**उत्तर :** अहोरात्र भरती असलेले

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७**
[कविवर्य नारायण सुर्वे ................
................ मनापासून हसला.]

### कृती २ – आकलन

**१. असत्य विधान ओळखा.**

i. कविवर्य नारायण सुर्वे खूप सभा गाजवत.
ii. नारायण सुर्वे यांच्या कार्यक्रमांना नेहमी गर्दी असे.
iii. नारायण सुर्वे साहित्य संमेलनाचे उपाध्यक्ष झाले.
iv. शालीमुळे शालीनता येते असे लेखकास वाटत नव्हते.

**उत्तर :** नारायण सुर्वे साहित्य संमेलनाचे उपाध्यक्ष झाले.

*२. **कारण शोधून लिहा.**
**शालींच्या वर्षावामुळे नारायण सुर्वे यांची शालीनता हरवली नाही, कारण....**

**उत्तर :** नारायण सुर्वे हे मुळातच शालीन होते.

*३. **खालील वाक्यातील कृतींतून किंवा विचारांतून कळणारे लेखकाचे गुण शोधा.**
**खरे तर, खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते!**

**उत्तर :** मनाचा सच्चेपणा, प्रगल्भता

**४. एका वाक्यात उत्तर लिहा.** [मार्च २०१९]
**सन्मानाची प्रतीके लिहा.**

**उत्तर :** शाल व श्रीफळ ही सन्मानाची प्रतीके आहेत.

### कृती ३ – स्वमत

**१. 'शालीनता' या गुणाविषयी तुमचे मत लिहा.**

**उत्तर :** 'शालीनता' म्हणजेच नम्रता. प्रत्येक व्यक्तीमध्ये हा गुण असणे महत्त्वाचे आहे, असे मला वाटते. शालीन व्यक्ती यशाच्या शिखरावर असतानाही अहंकाराने, उद्धटपणाने वागत नाहीत. या शालीनतेमुळे लोकांनाही त्यांच्याबद्दल प्रेम वाटते. शिवाय, ते लोकांच्या मनात स्वत:चे खास स्थान निर्माण करू शकतात. याउलट, जे लोक लहानमोठ्या यशाने आपली शालीनता घालवून बसतात त्यांचे गर्वाचे घर खाली येण्यास वेळ लागत नाही. यश मिळूनही नम्र, साधे राहणाऱ्या सचिन तेंडुलकर किंवा प्रकाश आमटेंसारख्या व्यक्ती नेहमीच सर्वांना हव्याहव्याशा वाटतात, म्हणूनच प्रत्येकाने शालीनता हा गुण स्वत:मध्ये आणावा, असे मला वाटते.

## परिच्छेद ३

### कृती १ – आकलन

**१. आकृतिबंध पूर्ण करा.**

**ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बसलेल्या भिक्षेकऱ्याचे वर्णन** → ☐ ☐ ☐ ☐

**उत्तर :** १. म्हातारा    २. अशक्त
३. चिरगुटे टाकून व पांघरून बसलेला
४. कुडकुडणारा

**२. चौकट पूर्ण करा.**

i. **शालींचा सन्मान करण्यासाठी वापर करण्यात लेखकास हा धोका वाटतो** → ☐

ii. **लेखकाच्या मित्राचा महत्त्वाचा गुण** → ☐

**उत्तर :** i. शालीन जग गमावून बसण्याचा
ii. अतिप्रामाणिकपणा

Sample Content

*३. **उत्तर लिहा.**
२००४ च्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष –
**उत्तर :** लेखक रा. ग. जाधव

४. **कोण ते लिहा.**
i. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाल्यावर शालींचा वर्षाव झालेले –
ii. स्वत:च्या छोट्याशा खोलीत लेखकाच्या शाली सांभाळून ठेवणारा –
iii. लेखकाला थरथरत्या हातांनी नमस्कार करणारा –
**उत्तर :** i. लेखक ii. लेखकाचा मित्र
iii. म्हातारा भिक्षेकरी

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७, ८**
[शालीमुळे शालीनता ................
................ नमस्कार केला.]

## कृती २ – आकलन

*१. **खालील प्रसंगी लेखकाने केलेली कृती लिहा.**
**म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे पाहिले.**
**उत्तर :** लेखकाने दुसऱ्याच दिवशी त्या भिक्षेकऱ्यास दोन शाली दिल्या.

२. **'ओंकारेश्वर' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.**
**उत्तर :** लेखक संध्याकाळच्या वेळेस कोणत्या मंदिरात जात असे ?

३. **कारणे शोधून लिहा.**
*i. **लेखकाच्या मते शालीमुळे शालीनता जाते, कारण...**
**उत्तर :** शाल हे सन्मानाचे प्रतीक आहे व सन्मान केल्यानंतर अनेक वेळा तो सन्मान मिळवणारी व्यक्ती अहंकारी बनते.

ii. **लेखकाने आपल्या शाली मित्राकडे ठेवण्यास दिल्या, कारण...**
**उत्तर :** लेखकाची खोली आठ बाय सहा एवढ्याच मापाची असल्याने त्यात शालींसाठी जागा होणे शक्यच नव्हते.

*४. **खालील वाक्यांतील कृतींतून किंवा विचारांतून कळणारे लेखकाचे गुण शोधा.**
**हळूहळू मी सगळ्या शाली वाटून टाकल्या.**
**उत्तर :** मनाचा मोठेपणा, दानशूरता

## कृती ३ – स्वमत

१. **आपल्याकडे पडून असलेल्या, वापरात नसलेल्या वस्तू गरजूंना देणे तुम्हांला पटते का ?**
**उत्तर :** आपल्या घरात वर्षानुवर्षे कितीतरी वस्तू धूळ खात पडलेल्या असतात. कधीतरी उपयोग होईल या विचाराने आपण त्या ठेवून देतो; मात्र त्या वस्तूंचा वापर काही होत नाही. या समाजात कितीतरी लोक असे आहेत ज्यांना या वस्तूंची गरज असते; पण ते पैशांअभावी त्या विकत घेऊ शकत नाहीत. आपल्या आसपासच्या गरजू व्यक्तींना उपयोगात येतील अशा वस्तू दिल्या पाहिजेत. घरातील जुने कपडे, चादरी, खेळणी, पुस्तके, भांडी अशा वापरात नसलेल्या; पण चांगल्या वस्तू गरजूंना देणे सहज शक्य असते. प्रत्येकानेच जर थोडी थोडी माणुसकी दाखवत आपल्याकडील या वस्तूंचा असा वापर केला, तर अनेक गरजूंना त्याचा लाभ होईल आणि त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून आपल्याही चेहऱ्यावर हसू खुलेल.

# परिच्छेद ४

## कृती १ – आकलन

१. **आकृतिबंध पूर्ण करा.**

**लेखकाच्या मते सर्वांनी हे करावे**
→ ☐ ☐ ☐

**उत्तर :** १. भुकेल्यास अन्न द्यावे
२. तहानलेल्यास पाणी द्यावे
३. अभाग्यांना सन्मानाच्या शाली द्याव्यात

२. **योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**
**लेखकाला काही कारणांमुळे ...............**
i. म्हाताऱ्या भिक्षेकऱ्याकडे जाणे जमले नाही.
ii. ओंकारेश्वराला जाण्यास उसंत मिळाली नाही.
iii. शाली म्हाताऱ्याला द्याव्या लागल्या.
**उत्तर :** ओंकारेश्वराला जाण्यास उसंत मिळाली नाही.

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ८**
[पुढे चार-पाच दिवस ................
................ तरी द्याव्यात !]

## कृती २ – आकलन

१. **असत्य विधान ओळखा.**
i. भिक्षेकरी पुलाच्या जवळपास मध्यावर होता.
ii. भिक्षेकऱ्याने शाली विकल्या.
iii. भिक्षेकरी दोन-तीन दिवस पोटभर जेवला.
iv. शालीची शोभा पोटाच्या आगीपेक्षा महत्त्वाची असते.
**उत्तर :** शालीची शोभा पोटाच्या आगीपेक्षा महत्त्वाची असते.

Sample Content

२. **एका वाक्यात उत्तर लिहा.**

**लेखकाने दिलेल्या शालींचे म्हाताऱ्याने काय केले ?**

**उत्तर :** लेखकाने दिलेल्या शाली म्हाताऱ्याने विकल्या व त्या पैशांत दोन-तीन दिवस पोटभर जेवून घेतलं.

३. **कारण लिहा.**

**म्हाताऱ्या भिक्षेकऱ्याने शाली विकल्या.**

**उत्तर :** शालीची शोभा आणि ऊब यांपेक्षा पोटाची आग आणि अन्नाची ऊब अधिक महत्त्वाची असते, म्हणूनच म्हाताऱ्या भिक्षेकऱ्याने दोन-तीन दिवस पोट भरून जेवणासाठी शाली विकल्या.


## कृती ३ – स्वमत

१. **'भुकेलेल्यांना अन्न, तहानलेल्यास पाणी द्यावे आणि हेही जमले नाही, तर अभाग्यांना सन्मानाच्या शाली द्याव्यात' असे लेखकाने का म्हटले असावे ? तुमचे मत लिहा.**

**उत्तर :** आपण ज्या समाजात राहतो त्या समाजासाठी काही कार्य करणे अतिशय आवश्यक आहे. जर प्रत्येकाने फक्त स्वार्थी विचार केला, तर समाजातील गरजूंना त्यांचे जीवन नीट जगता येणार नाही. प्रत्येकाला जीवन जगण्याचा समान अधिकार आहे. त्यामुळे, प्रत्येक व्यक्तीने आपल्या आसपासच्या गरजू व्यक्तीची आवश्यकता ओळखून त्याला मदत केली पाहिजे. मग ती मदत भुकेलेल्यास अन्न, तहानलेल्यास पाणी अशा कोणत्याही स्वरूपात असू शकते. लेखकाच्या मते एखाद्या व्यक्तीस जर दुसऱ्यास कोणत्याच स्वरूपाची मदत करणे शक्य नसेल, तर निदान त्याने त्याच्याजवळ असलेल्या व वापरात नसलेल्या वस्तूंचे गरजूंना दान करण्याची उदारता दाखवावी. या साऱ्याचा विचार करता अभाग्यांना सन्मानाच्या शाली द्याव्यात असे विधान लेखक करतात; जे अगदी योग्य आहे असे मला वाटते.

## पाठाधारित कृती

*१. **शालीचे पाठात आलेले विविध उपयोग लिहा.**




**उत्तर :** १. सन्मान करण्यासाठी
२. शोभा वाढवण्यासाठी
३. लहान मुलाला ऊब देण्यासाठी
४. भिक्षेकऱ्याला पांघरण्यासाठी
५. शाल विकून अन्नाची ऊब मिळवण्यासाठी

*२. **आकृती पूर्ण करा.**




**उत्तर :** १. विश्वकोशाचा अध्यक्ष
२. मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष

३. **स्वमत**

*i. **'शाल व शालीनता' यांचा पाठाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा. [मार्च २०२२]**

**उत्तर :** शालीनता हा एक स्वभावगुण आहे, जो मुळातच व्यक्तीमध्ये असावा लागतो, तर शाल हे सन्मानाचे प्रतीक मानले जाते. व्यक्तीचा गौरव करण्याकरता श्रीफळ व शाल दिली जाते; मात्र या सन्मानाच्या रूपाने व्यक्तीला मिळालेली शाल व शालीनता यांचा संबंध असेलच असे नाही. कवी नारायण सुर्वेही हीच बाब सांगतात. शाल मिळालेली प्रत्येक व्यक्ती शालीन असेल किंवा शाल न मिळालेली प्रत्येक व्यक्ती शालीन नसेल असे होत नाही. शाल पांघरून मनाची, आचरणातील शालीनता मिळवता येत नाही. त्याचप्रमाणे मुळातच शालीन असणारी व्यक्ती शाल रूपाने सन्मान मिळवतेच असेही नाही; मात्र ती व्यक्ती आपल्यातील शालीनता जपून ठेवते. त्यामुळे, 'शाल आणि शालीनता' यांचा विशेष संबंध असेलच असे नाही.

*ii. **'भिक्षेकऱ्याने केलेला शालीचा उपयोग', याविषयी तुमचे मत लिहा.**

**उत्तर :** माझ्या मते भिक्षेकऱ्याने शालीचा केलेला उपयोग त्याच्या परिस्थितीला अनुरूप होता. अन्न ही मानवाची मूलभूत गरज आहे. ही गरज भागवण्याकरता भिक्षेकऱ्याने शाली विकण्याचा घेतलेला निर्णय योग्यच होता. शरीराचे थंडीपासून रक्षण करण्याकरता लेखकाने दिलेल्या शाली भिक्षेकऱ्याला उपयुक्त ठरणार होत्या; मात्र शरीराच्या उबेची गरज ही त्याच्याकरता दुय्यम होती. पोटात भुकेचा डोंब उसळलेल्या त्या भिक्षेकऱ्याला पोटभर अन्नाची अधिक गरज वाटली. त्यामुळे, मागचा-पुढचा विचार न करता त्याने त्या शाली विकल्या. त्यातून मिळालेल्या पैशांतून त्याने आपली प्राथमिक गरज भागवली. त्याला जाणवणारी भूक ही त्याला बोचणाऱ्या थंडीपेक्षा अधिक तीव्र होती. त्यामुळे, त्याने घेतलेला हा निर्णय योग्यच होता असे मला वाटते.

iii. **रा.ग.जाधव यांची संवेदनशीलता जाणवणारे कोणतेही एक उदाहरण पाठाच्या आधारे स्पष्ट करा. [मार्च २०१९]**

**उत्तर :** विश्वकोशाचे अध्यक्ष म्हणून वाईला राहत असताना एकदा लेखक रा. ग. जाधव यांना कृष्णा नदीवर मासे पकडणारी एक बाई दिसली. कडाक्याच्या थंडीत तिने

Sample Content

तिचे मूल तटावर एका टोपलीत ठेवले होते. थंडीने कुडकुडून रडणाऱ्या मुलाकडे लक्ष देणेही तिला शक्य नव्हते. लेखकाचे मन या प्रसंगाने भरून आले. त्यांनी तिला पाचपन्नास रुपये व आपल्याकडील शाल दिली व त्या बाळाला शालीत गुंडाळायला सांगितले. खरे तर ती शाल लेखकाला पु. ल. देशपांडे व सुनीताबाई यांनी दिली होती. त्यामुळे, त्यांच्यासाठी ती गौरवाची, मानाची शाल होती. पु.लं. ची आठवण म्हणून कौतुकाने ती त्यांना स्वत:जवळ ठेवावीशी वाटणे साहजिक होते; पण लेखकाने मात्र स्वत:च्या गौरवाला महत्त्व न देता माणुसकीला महत्त्व दिले. एका अनोळखी बाळाची काळजी त्यांना अस्वस्थ करून गेली. यातूनच त्यांची संवेदनशीलता जाणवते.

## भाषाभ्यास विभाग

### अ. व्याकरण घटकांवर आधारित कृती

**१. खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.**
**(विधानार्थी / प्रश्नार्थी / उद्गारार्थी / आज्ञार्थी)**

i. या शाली घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.
ii. शाल व शालीनता यांचा संबंध काय?
iii. खरेतर खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते!
iv. त्या बाळाला आधी शालीत गुंडाळ आणि मग मासे मारत बैस.

**उत्तर :** i. विधानार्थी वाक्य ii. प्रश्नार्थी वाक्य
iii. उद्गारार्थी वाक्य iv. आज्ञार्थी वाक्य

**२. कंसातील सूचनेनुसार वाक्यरूपांतर करा.**

i. शाल व शालीनता यांचा काहीही संबंध नाही. (प्रश्नार्थी करा.)
ii. आमचं हे असलं बिकट जिणं! (विधानार्थी करा.)
iii. भिकाऱ्याला शाली कशा शोभतील? (विधानार्थी करा.)
iv. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणे शक्य नव्हते. (होकारार्थी करा.)

**उत्तर :** i. शाल व शालीनता यांचा संबंध काय?
ii. आमचं जिणं खूप बिकट आहे.
iii. भिकाऱ्याला शाली शोभणारच नाहीत.
iv. एवढ्या शाली जमत गेल्या, की माझ्या आठ बाय सहाच्या खोलीत त्यांना ठेवणे अशक्य होते.

**३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**

i. ताब्यात घेणे ii. एका पायावर हो म्हणणे
iii. भिकेला लागणे iv. उसंत न लाभणे
v. चक्कर मारणे

**उत्तर :**

**i. ताब्यात घेणे** – कब्जात घेणे.
**वाक्य :** शिवरायांनी आपल्या शौर्याच्या बळावर अनेक गड **ताब्यात घेतले.**

**ii. एका पायावर हो म्हणणे** – एखाद्या गोष्टीसाठी लगेच होकार देणे.
**वाक्य :** आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनात आमच्या वर्गाचा प्रतिनिधी होण्यासाठी वर्गशिक्षकांनी विचारले असता मी **एका पायावर हो म्हटले.**

**iii. भिकेला लागणे** – दारिद्र्य येणे.
**वाक्य :** सावकाराकडून घेतलेली कर्जे फेडता फेडता अनेक शेतकरी **भिकेला लागले.**

**iv. उसंत न लाभणे** – विश्रांती/वेळ न मिळणे.
**वाक्य :** दिवाळी जवळ आली, की आईला अनेक कामांमधून **उसंत लाभत नाही.**

**v. चक्कर मारणे** – फेरी मारणे.
**वाक्य :** नानू आजोबा नव्वद वर्षांचे आहेत; पण दररोज न चुकता बाहेर एक तरी **चक्कर मारतातच.**

### आ. भाषिक घटकांवर आधारित कृती

**१. अधोरेखित शब्दासाठी योग्य समानार्थी शब्द वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

*i. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या <u>चिंचोळ्या</u> प्रवाहावर होत्या.
ii. पु.लं च्या हातून शाल मिळावी हा मोठा <u>गौरव</u> होता.
*iii. नारायण सुर्वे यांच्या कार्यक्रमांना <u>अहोरात्र</u> भरतीच असे.
*iv. मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून <u>निकटवर्ती</u> मित्राकडे ठेवले.
v. हळूहळू मी सगळ्या शाली गरीब <u>श्रमिकांना</u> वाटून टाकल्या.

**उत्तर :** i. खोलीच्या दक्षिणेकडील खिडक्या कृष्णा नदीच्या **अरुंद** प्रवाहावर होत्या.
ii. पु.लं च्या हातून शाल मिळावी हा मोठा **सन्मान** होता.
iii. नारायण सुर्वे यांच्या कार्यक्रमांना **रात्रंदिवस** भरतीच असे.
iv. मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून **जवळच्या** मित्राकडे ठेवले.
v. हळूहळू मी सगळ्या शाली गरीब **कष्टकऱ्यांना** वाटून टाकल्या.



Sample Content

**२. खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.**

i. आठवण ii. बिकट

**उत्तर :** i. स्मरण ii. कठीण

**३. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

i. थंडी × ii. दक्षिण ×
iii. चिंचोळा × iv. खरेदी ×
v. शक्य × **[जुलै २०१९]**
vi. प्रामाणिक × vii. अशक्त ×

**उत्तर :** i. गरमी ii. उत्तर
iii. रुंद iv. विक्री
v. अशक्य vi. अप्रामाणिक
vii. सशक्त

**४. खालील शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

i. कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला, कर्जात बुडलेला –
ii. अत्यंत जवळचा –
iii. श्रम करणारे –
iv. भिक्षा मागणारा –
v. भाग्याचा अभाव असलेला –

**उत्तर :** i. कर्जबाजारी ii. निकटवर्ती
iii. श्रमिक iv. भिक्षेकरी
v. अभागी

**५. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?
ii. मी सगळ्या शालींचे गाठोडे बांधून ते निकटवर्ती मित्राकडे ठेवले.
iii. कविवर्य नारायण सुर्वेनी संमेलने गाजवली.
iv. तो शालीन कवी मनापासून हसला.

**उत्तर :** i. तुम्हांला **शाली दिल्या** तर चालेल काय?
ii. मी सगळ्या **शालींची गाठोडी** बांधून **ती** निकटवर्ती मित्राकडे **ठेवली**.
iii. कविवर्य नारायण सुर्वेनी **संमेलन गाजवले.**
iv. **ते** शालीन **कवी** मनापासून **हसले.**

**६. खालील शब्दांचे वचन बदला.**

i. खोली ii. नदी
iii. मासे iv. घटना
v. चिरगुटे vi. मंदिर

**उत्तर :** i. खोल्या ii. नद्या
iii. मासा iv. घटना
v. चिरगूट vi. मंदिरे

**७. अधोरेखित शब्दांचे लिंग बदलून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. पुढे ते साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले.
ii. तो शालीन कवी मनापासून हसला.
*iii. तो मुलगा गरिबांना मदत करतो.
*iv. लेखक सुंदर लेखन करतात.

**उत्तर :** i. पुढे **त्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा झाल्या**.
ii. **ती** शालीन **कवयित्री** मनापासून **हसली**.
iii. **ती मुलगी** गरिबांना मदत **करते**.
iv. **लेखिका** सुंदर लेखन **करतात.**

**८. अचूक शब्द ओळखून लिहा.**

i. मंदीर / मंदिर / मन्दीर / मदींर
ii. सर्वाधीकार / सवार्धीकार / सर्वाधिकार / सव्राधीकार
iii. चिरगुटे / चीरगुटे / चीरगूटे / चिरगूटे
iv. श्रमीक / शरमीक / श्रमिक / शरमिक

**उत्तर :** i. मंदिर ii. सर्वाधिकार
iii. चिरगुटे iv. श्रमिक

**९. खालील वाक्यांत योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

i. तुम्हांला शाल दिली तर चालेल काय
ii. या शाली घेऊन घेऊन आता मी शालीन बनू लागलो आहे
iii. मी एका पायावर हो म्हटले
iv. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी हा मला मोठा गौरव वाटला

**उत्तर :** i. "तुम्हांला शाल दिली तर चालेल काय?"
ii. "या शाली घेऊन घेऊन आता मी 'शालीन' बनू लागलो आहे."
iii. मी एका पायावर 'हो' म्हटले.
iv. पु. ल. व सुनीताबाई यांनी मला शाल द्यावी, हा मला मोठा गौरव वाटला.

Sample Content

Page no. **21** to **147** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes & Target E - Notes**

Sample Content

# व्याकरण विभाग

## १. वाक्यांचे प्रकार व वाक्यरूपांतर

पूर्ण अर्थ व्यक्त करणारा शब्दसमूह म्हणजे 'वाक्य' होय. प्रत्येक वाक्य एक संपूर्ण विधान असते.

### वाक्यांचे प्रकार

अर्थाच्या अनुरोधाने वाक्यांचे वेगवेगळे प्रकार होतात.

**१. विधानार्थी वाक्य :**

ज्या वाक्यात एक सरळ विधान केलेले असते, त्या वाक्याला 'विधानार्थी वाक्य' म्हणतात.

**उदा.** कल्पवृक्षाचा प्रत्येक अवयव उपयोगी असतो.

**२. प्रश्नार्थी वाक्य :**

या वाक्यात प्रश्न विचारलेला असतो. वाक्याच्या शेवटी प्रश्नचिन्ह ( ?) असते.

**उदा.** i. माझे पत्र आले का ?

ii. भाऊ केव्हा परत येतील ?

**३. आज्ञार्थी वाक्य :**

ज्या वाक्यांमुळे आज्ञा, हुकूम, विनंती, प्रार्थना, आशीर्वाद इत्यादी अर्थांचा बोध होतो, त्यांना 'आज्ञार्थी वाक्य' म्हणतात.

**उदा.** i. दरवाजा बंद कर. (आज्ञा)

ii. वर्गाबाहेर निघून जा. (हुकूम)

iii. तुझ्या सहवासात तरी मला आनंद मिळू दे. (विनंती)

iv. खूप शिक व मोठा हो. (आशीर्वाद)

**४. उद्‌गारार्थी वाक्य :**

ज्या वाक्यात एखादी भावना दर्शवणारा उद्‌गार असतो, त्या वाक्याला 'उद्‌गारार्थी वाक्य' म्हणतात.

**उदा.** i. किती सुंदर बाग आहे ! (आनंद)

ii. छे, मला आवडत नाही हे ! (घृणा)

iii. बाप रे ! केवढी मोठी इमारत ही ! (भीती)

iv. आई गं ! किती लागलंय तुला ! (हळहळ)

### सरावासाठी प्रश्न

**कृ. १. खालील वाक्यांचे प्रकार ओळखा.**
**(विधानार्थी / प्रश्नार्थी / उद्‌गारार्थी / आज्ञार्थी)**

i. किती उंच पर्वत आहे हा !

ii. ज्येष्ठ व्यक्तींचा आदर करा.

iii. तुम्ही मला मदत कराल का ?

iv. तो मुंबईला निघून गेला.

v. आम्ही सर्वजण सहलीला निघालो.

vi. किती चविष्ट आहेत हे समोसे !

vii. बाहेर पाऊस पडतो आहे का ?

viii. मुलांनो, जरा गप्प बसा.

ix. अक्षय दररोज अभ्यास करतो. **[मार्च २०२२]**

x. अहाहा ! किती सुंदर देखावा हा ! **[मार्च २०२२]**

**उत्तर :** i. उद्‌गारार्थी वाक्य ii. आज्ञार्थी वाक्य
iii. प्रश्नार्थी वाक्य iv. विधानार्थी वाक्य
v. विधानार्थी वाक्य vi. उद्‌गारार्थी वाक्य
vii. प्रश्नार्थी वाक्य viii. आज्ञार्थी वाक्य
ix. विधानार्थी वाक्य x. उद्‌गारार्थी वाक्य

### वाक्यपरिवर्तन (वाक्यरूपांतर)

वाक्यरूपांतर म्हणजे वाक्याच्या अर्थात बदल न घडू देता वाक्याच्या रूपात किंवा रचनेत केलेला बदल होय. आपण बोलताना एकाच स्वरूपाच्या वाक्यरचनेत बोलू लागलो, तर ऐकणाऱ्याला त्याचा कंटाळा येईल. बोलताना, वाचताना, लिहिताना वाक्यरचनेत बदल केला, तर आपली भाषा अधिक परिणामकारक होईल.

**अ. प्रश्नार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर.**

**उदा.**

i. आम्ही तुमचे उपकार कसे विसरू ? (प्रश्नार्थी)
आम्ही तुमचे उपकार विसरणार नाही. (विधानार्थी)

ii. आवडती वस्तू हरवल्यास कोणाला दु :ख होणार नाही ? (नकारार्थी)
आवडती वस्तू हरवल्यास प्रत्येकाला दु :ख होते. (होकारार्थी)

**[टीप :** प्रश्नार्थक वाक्याचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करायचे असल्यास प्रश्न होकारार्थी असेल, तर विधानार्थी वाक्य नकारार्थी ठेवावे व प्रश्न नकारार्थी असेल, तर विधानार्थी वाक्य होकारार्थी ठेवावे.**]**

### सरावासाठी प्रश्न

**कृ. १. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

**i. इतकं वाईट कुणी वागतं का ? (विधानार्थी करा.)**

**उत्तर :** इतकं वाईट कुणीच वागत नाही.

**ii. मी तुम्हांला चांगलं ओळखते. (प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर :** मी तुम्हांला ओळखत नाही का ?



Sample Content

**iii. हा मुलगा कुणाचे ऐकतो का ? (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** हा मुलगा कुणाचेही ऐकत नाही.

**iv. विश्वासने तेथे जायला हवं. (प्रश्नार्थी करा.)**
**उत्तर :** विश्वासने तेथे जायला नको का ?

**v. हे काम करायलाच हवं. (प्रश्नार्थी करा.)**
**उत्तर :** हे काम करायला नको का ?

**vi. अशाने मुलं कशी सुधारतील ? (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** अशाने मुलं सुधारणार नाहीत.

**vii. कष्टाशिवाय फळ मिळत नाही. (प्रश्नार्थी करा.)**
**उत्तर :** कष्टाशिवाय फळ कसे मिळणार ?

**viii. फूल लपवल्याने त्याचा सुगंध लपेल का ? (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** फूल लपवल्याने त्याचा सुगंध लपत नाही.

**ix. आपल्या शाळेची मुलं शिस्त तोडतील असं होईल का ? (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** आपल्या शाळेची मुलं शिस्त नक्कीच तोडणार नाहीत.

**x. संगीत सर्वांनाच आवडते. (प्रश्नार्थी करा.)**
**उत्तर :** संगीत कोणाला आवडत नाही ?

**ब. उद्‌गारार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर.**

**उदा.** किती गोड चहा आहे हा! (उद्‌गारार्थी वाक्य)
चहा खूपच गोड आहे. (विधानार्थी वाक्य)

उद्‌गारार्थी वाक्य हे विधानार्थी वाक्यापेक्षा अधिक परिणामकारक वाटते. एखाद्या गोष्टीतील आधिक्य, मनातील तीव्र इच्छा किंवा भावना व्यक्त करण्यासाठी उद्‌गारार्थी वाक्य वापरतात. अशा उद्‌गारार्थी वाक्यांचे विधानार्थी वाक्यात रूपांतर करताना कोणत्या गोष्टीची विपुलता व्यक्त करायची आहे ते स्पष्ट करायला हवे.

### सरावासाठी प्रश्न

**कृ. १. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

**i. केवढा मोठा साप आहे हा! (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** हा साप खूप मोठा आहे.

**ii. ते ठिकाण प्रवासाच्या दृष्टीने खूप लांब वाटले. (उद्‌गारार्थी करा.)**
**उत्तर :** प्रवासाच्या दृष्टीने किती लांब होते ते ठिकाण!

**iii. वा! किती छान आहे हा देखावा! (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** हा देखावा खूप छान आहे.

**iv. या हरणाचे डोळे खूप निरागस आहेत. (उद्‌गारार्थी करा.)**
**उत्तर :** किती निरागस डोळे आहेत या हरणाचे!

**v. वा! किती छान गुण मिळवलेस तू! (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** तू खूप छान गुण मिळवले आहेस.

**vi. तो नजारा सुंदर होता. (उद्‌गारार्थी करा.)**
**उत्तर :** किती सुंदर होता तो नजारा!

**vii. अरेरे! केवढ्या जोरात आदळला हा! (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** हा खूप जोरात आदळला.

**viii. मनात खूप आठवणी साठल्या आहेत. (उद्‌गारार्थी करा.)**
**उत्तर :** किती आठवणी साठल्यात मनात!

**ix. किती सुंदर गीत आहे हे! (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** हे गीत खूप सुंदर आहे.

**x. ताजमहालचे सौंदर्य अवर्णनीय आहे.(उद्‌गारार्थी करा.) [डिसेंबर २०२०]**
**उत्तर :** वा! ताजमहालचे सौंदर्य केवळ अवर्णनीयच!

**xi. ही इमारत खूप उंच आहे. (उद्‌गारार्थी करा.) [मार्च २०२२]**
**उत्तर :** अबब! किती उंच इमारत आहे ही!

**क. आज्ञार्थी व विधानार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर.**

**उदा.** दरवाजा बंद कर. (आज्ञार्थक)
दरवाजा बंद करावा. (विधानार्थी)

आज्ञार्थक वाक्यात आज्ञा अपेक्षित आहे. विधानार्थी वाक्यात सरळ विधान अपेक्षित असते. या वाक्यांचे रूपांतर करताना त्यांतील भावार्थ लक्षात घेणे गरजेचे आहे.

### सरावासाठी प्रश्न

**कृ. १. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

**i. ते पुस्तक आण. (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** ते पुस्तक आणावे.

**ii. अक्षर सुंदर काढावे. (आज्ञार्थी करा.)**
**उत्तर :** अक्षर सुंदर काढा.

**iii. दररोज अभ्यास करावा.(आज्ञार्थी करा.)[मार्च २०१९]**
**उत्तर :** दररोज अभ्यास करा.

**iv. आता नवीन घर बांधा. (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** आता नवीन घर बांधावे.

**v. वर्गाबाहेर निघून जा. (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** तू वर्गाबाहेर निघून जावेस.

**vi. गुरुजनांचा आदर करावा. (आज्ञार्थी करा.)**
**उत्तर :** गुरुजनांचा आदर करा.

**vii. जबाबदारीने काम करा. (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** जबाबदारीने काम करावे.

**viii. सर्वांशी प्रेमाने वागावे. (आज्ञार्थी करा.)**
**उत्तर :** सर्वांशी प्रेमाने वागा.

**ix. एकमेकांना मदत करा. (विधानार्थी करा.)**
**उत्तर :** एकमेकांना मदत करावी.

**x. नेहमी खरे बोलावे. (नकारार्थी करा.) [मार्च २०२०]**
**उत्तर :** कधीही खोटे बोलू नये.

**ड. होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर.**

**उदा.** तो आता मोठा झाला आहे. (होकारार्थी)
तो आता काही लहान राहिला नाही. (नकारार्थी)

दोन्ही वाक्यांचा अर्थ एकच आहे; पण दुसऱ्या वाक्याची परिणामकारकता 'मोठा' च्या विरुद्धार्थी शब्द 'लहान' मुळे वाढली आहे. अर्थ न बदलता अशाप्रकारे, होकारार्थी व नकारार्थी वाक्यांचे परस्पर रूपांतर करता येते.

## सरावासाठी प्रश्न

**कृ.१. कंसात दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

**i. तू अगदीच असमंजस आहेस. (नकारार्थी करा.)**
**उत्तर :** तू अजिबात समंजस नाहीस.

**ii. तिचा स्वभाव वाईट नाही. (होकारार्थी करा.)**
**उत्तर :** तिचा स्वभाव बऱ्यापैकी चांगला आहे.

**iii. घरात असलेली भाजी शिळी असावी. (नकारार्थी करा.)**
**उत्तर :** घरात असलेली भाजी ताजी नसावी.

**iv. तिने उत्तम स्वयंपाक बनवला. (नकारार्थी करा.)**
**उत्तर :** तिने बनवलेला स्वयंपाक नक्कीच वाईट नव्हता.

**v. विश्वाचा पसारा अमर्याद आहे. (नकारार्थी करा.)**
**उत्तर :** विश्वाचा पसारा मर्यादित नाही.

**vi. सावलीला वर्गात सर्वांत जास्त गुण आहेत. (नकारार्थी करा.)**
**उत्तर :** वर्गात सावलीपेक्षा जास्त गुण कोणालाच नाहीत.

**viii. आज पहाटे रानात उजेड नव्हता. (होकारार्थी करा.) [मार्च २०२२]**
**उत्तर :** आज पहाटे रानात काळोख होता.

**ix. कधीही उद्धटपणे वागू नये. (होकारार्थी करा.)**
**उत्तर :** नेहमी नम्रपणे वागावे.

**x. लबाडीने मिळवलेले यश जास्त काळ टिकत नाही. (होकारार्थी करा.)**
**उत्तर :** लबाडीने मिळवलेले यश थोडाच काळ टिकते.

**xi. मला हे चित्र नापसंत नाही. (होकारार्थी करा.) [मार्च २०१९]**
**उत्तर :** मला हे चित्र पसंत आहे.

# २. लेखननियम

मराठी भाषेचे लेखन करताना व्याकरणातील नियमांना अनुसरून लेखन अचूक व्हावे, त्यात वस्तुनिष्ठ रीतीने समानता यावी, याकरता 'महाराष्ट्र साहित्य महामंडळा' ने 'शुद्धलेखनविषयक नियमावली' निर्धारित केली आहे.

**मराठीच्या लेखनाचे काही महत्त्वाचे नियम पुढीलप्रमाणे :**

## १. अनुस्वारांसंबंधीचे नियम

### नियम १

i. मराठीत स्पष्टोच्चारित अनुनासिकाबद्दल शीर्षबिंदू द्यावा.
**उदा.** गुलकंद, चिंच, तंटा, निबंध, आंबा.

ii. तत्सम (संस्कृतातून मराठीत आलेले) शब्द पर-सवर्ण वापरून लिहिता येतात.
**उदा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| रंग | पंकज | पंचमी | पंडित | अंबुज |
| रङ्ग | पङ्कज | पञ्चमी | पण्डित | अम्बुज |

म्हणजेच, 'रंग' या शब्दात अनुस्वारयुक्त 'र' च्या पुढे 'ग' हा वर्ण आहे. 'ग' चा पर-सवर्ण 'ङ्' आहे, म्हणून 'रंग' शब्दातील अनुस्वार काढून पर-सवर्ण वापरताना 'रङ्ग' असा लिहिला जाईल.

तसेच, 'पंचमी' या शब्दात अनुस्वारयुक्त 'प' च्या पुढे 'च' हा वर्ण आहे आणि 'च' चा पर-सवर्ण 'ञ' आहे, म्हणून 'पञ्चमी' हा शब्द अनुस्वार काढून पर-सवर्ण वापरून लिहायचा झाल्यास 'पञ्चमी' असा लिहिता येईल.

Sample Content

वर्ण व त्या गटांचे पर – सवर्ण अभ्यासा.

| वर्ण | | | | अनुनासिक / पर-सवर्ण |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ् |
| च | छ | ज | झ | ञ् |
| ट | ठ | ड | ढ | ण् |
| त | थ | द | ध | न् |
| प | फ | ब | भ | म् |

विशेषत: जुन्या साहित्यात पर-सवर्ण वापरून तत्सम शब्द लिहिण्याची पद्धत होती; परंतु सध्या अशी पर-सवर्णाने लिहिण्याची पद्धत सहसा वापरली जात नाही. त्याऐवजी अनुस्वारच वापरले जातात.

**टीप :** पर-सवर्ण लिहिण्याची पद्धत फक्त तत्सम शब्दांपुरतीच मर्यादित आहे. संस्कृत नसलेले मराठी शब्द शीर्षबिंदू देऊनच लिहिले जातात.

**उदा.** निबंध, घंटा, चिंच, लांब, मुलांना, घरांमध्ये इ.

**सूचना :**

वेदान्त, सुखान्त, दु:खान्त, देहान्त, वृत्तान्त, स्वरान्त, व्यंजनान्त, शालान्त – हे शब्द असेच लिहावेत. तसेच, वाङ्मय, वाङ्निश्चय, दिङ्मूढ, पराङ्मुख – हे शब्द असेच लिहावेत.

### नियम २

य्, र्, ल्, व्, श्, ष्, स्, ह् यांच्यापूर्वी येणाऱ्या अनुस्वारांबद्दल केवळ शीर्षबिंदू द्यावा.

**उदा.** सिंह, संयम, मांस, संहार या शब्दांचे उच्चार सिंव्ह संय्यम, मांव्स, संव्हार असे होत असले तरी लिहिताना तसे लिहू नयेत.

**टीप :** वरील नियमातून 'ष' वगळावा कारण या अक्षरापूर्वी अनुस्वार येणारा शब्द मराठीत नाही.

### नियम ३

नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्ती प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय लावताना अनुस्वार देणे गरजेचे आहे.

**उदा.** लोकांना, तुम्हांस, घरांपुढे, लोकांसमोर.

**टीप :** एखाद्या व्यक्तीचा आदरार्थी उल्लेख करताना अनुस्वार दिला जातो.

**उदा.** नेहरूंनी, आजोबांपाशी, आपणांस.

### नियम ४

वरील नियमांव्यतिरिक्त कोणत्याही कारणांसाठी व्युत्पत्तीने सिद्ध होणारे वा न होणारे अनुस्वार देणे आवश्यक नाही.

व्युत्पत्तीने सिद्ध होणारे –

| संस्कृत शब्द | पूर्वीचे लेखन | आजचे लेखन |
|---|---|---|
| कण्टक | कांटा | काटा |
| चञ्चु | चोंच | चोच |
| त्वम् | तूं | तू |
| नाम | नांव | नाव |

त्याचप्रमाणे इतर काही शब्द पूर्वी अनुस्वार देऊन लिहिले जात असत. उदा. कांहीं, नाहीं, हसूं, रडूं, एकदां यांसारख्या शब्दांवर आजच्या लेखनपद्धतीनुसार अनुस्वार देऊ नये.

## २. ऱ्हस्व-दीर्घसंबंधीचे नियम

### नियम ५

i. मराठी शब्दांत जोडाक्षर असल्यास जोडाक्षरापूर्वीचे इकार, उकार सामान्यत: ऱ्हस्व असतात.

**उदा.** कुस्ती, मुक्काम, पुष्कळ, शिस्त, दुष्काळ, पुस्तक, चिठ्ठी, डुक्कर, बिल्ला, चिक्की.

**अपवाद :** तत्सम (संस्कृत) शब्दांतील जोडाक्षरापूर्वीचे इकार व उकार ऱ्हस्व व दीर्घ दोन्ही प्रकारचे असतात.

**उदा.** पुण्य, तीक्ष्ण, पूज्य

ii. मराठी व तत्सम शब्दांमधील इकार व उकार असणाऱ्या अक्षरांवर अनुस्वार असेल, तर ती सामान्यत: ऱ्हस्व असतात.

**उदा.** चिंच, लिंबू, बिंदू, तुरुंग, उंच, लिंग, अरविंद, अरुंधती, दिंडी, पिंड, किंकाळी, चिंता, पुरचुंडी, पुंगी, धुंद, चिंधी हे शब्द अनुस्वारयुक्त आहेत, म्हणजेच शब्द मराठी किंवा तत्सम असला तरी अनुस्वारयुक्त अक्षरे ऱ्हस्व असतात.

### नियम ६

i. मराठीतील तत्सम इ–कारान्त आणि उ–कारान्त शब्द दीर्घान्त लिहावेत.

**उदा.** कवी, मती, गती, गुरू, पशू, सृष्टी, बहू.

ii. इतर शब्दांच्या शेवटी येणारे इ–कार व उ–कार दीर्घ लिहावेत.

**उदा.** पाटी, पैलू, जादू, विनंती, ही (शब्दयोगी अव्यय).

**अपवाद :** आणि, नि.

iii. तत्सम अव्यये ऱ्हस्वान्त लिहावीत.

**उदा.** परंतु, यथामति, यथाशक्ति, तथापि.

iv. सामासिक शब्दांतही तत्सम इ–कारान्त व उ–कारान्त शब्द पूर्वपदात असताना ऱ्हस्वान्त लिहावेत.

**उदा.** बुद्धिवैभव, कविमन, गतिशील, सृष्टिसौंदर्य, अणुशक्ती, विधिनिषेध, कृतिसमिती.

Sample Content

Page no. **152** to **156** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes & Target E - Notes**

Sample Content

# १ पत्रलेखन



पत्रलेखन ही एक कला मानली जाते. आपल्या मनातील भाव किंवा विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवण्याचे तसेच आपल्या भावना किंवा विचारांना चांगल्या भाषेत संक्रमित करण्याचे पत्र हे एक उत्तम लिखित साधन आहे.

## पत्रलेखनाची गरज

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात संगणक, भ्रमणध्वनी, इंटरनेट, मेल यांचा वापर करणे सहज शक्य झाल्याने प्रत्यक्ष पत्रलेखनाची गरज बऱ्याच प्रमाणात कमी झालेली असली तरी पत्रलेखनाकरता नव्या तंत्रज्ञानाचा वापर करणे ही आता काळाची गरज बनली आहे.

अनौपचारिक पत्राद्वारे आपल्या भावना प्रभावीपणे व्यक्त करता येणे तसेच औपचारिक पत्राद्वारे आपले म्हणणे, विचार, मागणी, विनंती इत्यादी बाबी योग्य व कमीत कमी शब्दांत संबंधित व्यक्तींपर्यंत पोहोचवणे हे अत्यंत महत्त्वाचे लेखनकौशल्य आहे. हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानानुसार, मेल पाठवण्याच्या पद्धतीनुसार पत्रलेखन करणे आवश्यक आहे.

## पत्रात समाविष्ट असलेल्या बाबी

| | औपचारिक | | अनौपचारिक |
|---|---|---|---|
| १. | प्रति, लिहून संबंधित व्यक्तीचा समर्पक हुद्दा नमूद करावा.<br>उदाहरणार्थ : मुख्याध्यापक, प्राचार्य, क्रीडाधिकारी, सचिव, अध्यक्ष, व्यवस्थापक, संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, कार्यकारी अभियंता इत्यादी. | १. | व्यक्तीचा उल्लेख योग्य प्रकारे, नात्याप्रमाणे व सन्मानपूर्वक करावा.<br>उदाहरणार्थ :<br>**नाते** – **मायना** – **अभिवादन**<br>आई/ वडील – तीर्थरूप } साष्टांग नमस्कार<br>काका/ काकू इत्यादी – तीर्थस्वरूप } साष्टांग नमस्कार<br>भावंडं – प्रिय – शुभाशीर्वाद |
| २. | पत्राचा मूळ विषय थोडक्यात लिहावा. | २. | पत्राचा विषय लिहिण्याची आवश्यकता नसते. |
| ३. | अचूक आणि मोजक्या शब्दांत नेमका आशय लिहावा लागतो. | ३. | व्यक्तीची खुशाली विचारावी. भावना प्रभावी शब्दांत मांडाव्यात, तसेच नात्यातील जिव्हाळा व्यक्त करणारे लेखन करावे. |
| ४. | पत्राचा समारोप करताना आवश्यकतेनुसार 'कळावे', 'तसदीबद्दल क्षमस्व' हे शब्द वापरावेत. त्यानंतर 'आपला विश्वासू'/ 'आपला नम्र'/ 'आपला कृपाभिलाषी' लिहावे. | ४. | पत्राचा समारोप करताना 'लोभ असावा', 'कळावे', हे शब्द आवश्यकतेनुसार लिहावेत. |
| ५. | पत्राच्या अंती डाव्या बाजूस पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. | ५. | पत्राच्या अंती डाव्या बाजूस पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा. |

[**टीप :** पत्राला उत्तर मिळणे आवश्यक असल्याने पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता लिहावा लागतो. सर्व पत्रांची मांडणी इ-पत्रानुसार डाव्या बाजूस लिहिणे अपेक्षित आहे. पाकीट काढून पत्ता लिहिण्याची आता आवश्यकता भासत नाही. (इ-मेल लिहिताना पाकीट काढण्याची आवश्यकता नसते.)]

Sample Content

## पत्रलेखनाचे प्रकार

यावर्षीच्या अभ्यासक्रमानुसार आपण खालील पत्रप्रकार अभ्यासू.

**पत्रलेखन**

- अनौपचारिक – जवळच्या, जिव्हाळ्याचे नाते असणाऱ्या व्यक्तीला पाठवले जाणारे पत्र
  - अभिनंदन पत्र
- औपचारिक – कार्यालयीन व व्यावसायिक कामकाजानिमित्त पाठवले जाणारे पत्र
  - मागणी पत्र
  - विनंती पत्र

## पत्राचे प्रारूप नमुना

दिनांक _______

प्रति, _______

माननीय _______ ,

विषय : _______

महोदय, _______

मुख्य मजकूर

आपला / आपली

_________

पत्ता

_________

(पत्र पाठवणाऱ्याचा पत्ता)

## पत्रलेखन नमुना कृती

१. **खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**'झाडे लावा... झाडे जगवा'**

**हिरवाई ट्रस्ट, तळेगाव दाभाडे**

दिनांक : ५ जून 'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त'

रोपांचे मोफत वाटप

संपर्क – हिरवाई ट्रस्ट, बालोद्यान मार्ग, तळेगाव दाभाडे
hirwaitrust@gmail.com

* विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने शाळेत वृक्षारोपण करण्यासाठी रोपांची मागणी करणारे पत्र लिहा.

**किंवा**

हिरवाई ट्रस्टमध्ये वनस्पती तज्ज्ञ म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल ताईचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

Sample Content

उत्तर : १. **मागणी पत्र (औपचारिक)**
दिनांक : ४ जून २०२२

प्रति,
माननीय संचालक
हिरवाई ट्रस्ट,
बालोद्यान मार्ग,
तळेगाव दाभाडे – xxxxxx
इमेल – hirwaitrust@gmail.com

**विषय :** 'वृक्षारोपणासाठी रोपांची मागणी करण्याबाबत.'

माननीय महोदय,

मी अ.ब.क, स्वामी विवेकानंद शाळेची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून आपणांस हे पत्र लिहित आहे. 'जागतिक पर्यावरण दिनानिमित्त' दिनांक ५ जून २०२२ रोजी हिरवाई ट्रस्ट 'झाडे लावा ... झाडे जगवा' हा उपक्रम राबवणार असल्याचे कळले. या उपक्रमात औषधी वनस्पतींच्या, फुलांच्या, फळांच्या रोपांचे मोफत वाटप होणार आहे. आमच्या स्वामी विवेकानंद शाळेच्या मोकळ्या मैदानात व शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्याची आमची इच्छा आहे. 'झाडे लावा, झाडे जगवा' या उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन पर्यावरण संवर्धनाच्या कार्यात आम्हांला खारीचा वाटा उचलायचा आहे.

यासाठी आपणाकडे उपलब्ध असलेल्या विविध रोपांचे प्रकारांनुसार प्रत्येकी ३ नग आपण पाठवून द्यावेत, जेणेकरून शाळेच्या परिसरात विविध झाडांची लागवड केली जाईल.

आमच्या विनंतीला मान देऊन आपण आम्हांस या स्तुत्य उपक्रमात सहभागी करून घ्याल, अशी आशा वाटते. त्याकरता आपण ही रोपे लवकरात लवकर शाळेच्या पत्त्यावर पाठवून द्यावीत ही नम्र विनंती.

कळावे,

आपली विश्वासू,
अ.ब.क.
विद्यार्थी प्रतिनिधी
स्वामी विवेकानंद शाळा,
रानडे रोड,
पुणे – xxxxxx
svschool@xyz.com

**किंवा**

२. **अभिनंदन पत्र (अनौपचारिक)**
दिनांक : ६ जून २०२२

प्रिय ताईस,
सप्रेम नमस्कार.

ताई सर्वप्रथम तुझे मनापासून अभिनंदन!
हिरवाई ट्रस्ट सारख्या पर्यावरण संवर्धन करणाऱ्या संस्थेमध्ये वनस्पती तज्ज्ञ म्हणून नियुक्त झाल्याबद्दल तुझे अभिनंदन!

हिरवाई ट्रस्ट ही आपल्या विभागातील पर्यावरण संवर्धनाकरता सतत प्रयत्नशील असलेली, पर्यावरणस्नेही लोकांनी उभारलेली संस्था म्हणून सर्वपरिचित आहे. अशा संस्थेचा एक भाग होणं ही खरंच भाग्याची गोष्ट आहे.

लहानपणापासून फुलांमध्ये-झाडांमध्ये रमण्याची तुझी आवड जपत आज तू त्याच क्षेत्रातील वनस्पती तज्ज्ञ म्हणून नावारूपास आली आहेस. खरंच आम्हां सर्वांना तुझा खूप अभिमान वाटतो.

पर्यावरण संवर्धनाच्या महत्त्वपूर्ण कार्यात तुझा हातभार लागणार आहे या विचाराने खूप छान वाटत आहे.
तुझ्या करिअरमधील या पहिल्या यशस्वी पावलाकरता तुझे पुन्हा एकदा अभिनंदन!

Sample Content

तुझाच
अ.ब.क.
२०३, वास्तू विठ्ठल,
पहिला माळा, भावनगर,
पुणे – xxxxxx
abc@xyz.com

***२. खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.**

**अ आ इ ई**
मराठी सुलेखन वर्ग
विनय ॲकॅडमीतर्फे

कालावधी
१ मे ते ३१

सुलेखन वर्गाचे आयोजन

संपर्क : विनय गायकवाड
२, सोमवार पेठ, कराड.

माफक फी

marathisulekhan@gmail.com
भ्रमणध्वनी – ८८४४००१७००

**विद्यार्थी या नात्याने या वर्गात प्रवेश देण्याची विनंती करणारे पत्र संबंधित व्यक्तीला लिहा.**

**उत्तर :** **विनंती पत्र (औपचारिक)**

दिनांक : २९ एप्रिल २०२२

प्रति,
माननीय श्री. विनय गायकवाड
संचालक, विनय ॲकॅडमी
२, सोमवार पेठ,
कराड – xxxxxx
इमेल – marathisulekhan@gmail.com

**विषय :** 'मराठी सुलेखन वर्गात प्रवेश मिळण्याबाबत.'

माननीय महोदय,

मी अ.ब.क, इयत्ता दहावीचा विद्यार्थी असून विनय ॲकॅडमीतर्फे आयोजित मराठी सुलेखन वर्गात प्रशिक्षण घेण्यास इच्छुक आहे. मागच्या सुट्टीत मी आपले 'अ, आ, इ, ई' हे पुस्तक वाचून काढले. या पुस्तकात आपण सुलेखन कसे करावे याबद्दल सांगितले आहे, ते वाचून मी प्रेरित झालो.

'सुंदर अक्षर हाच खरा दागिना' असे म्हटले जाते. मलाही माझे अक्षर सुव्यवस्थित, नीटनेटके व वळणदार करण्याची इच्छा आहे, म्हणून १ मे ते ३१ मे या कालावधीत चालणाऱ्या आपल्या सुलेखन प्रशिक्षण वर्गात मला प्रवेश घ्यायचा आहे ; पण येथे सहभागी होणाऱ्या मुलांची संख्या खूप असल्यामुळे मला प्रवेश मिळणे जरा कठीण झाले आहे.

एक प्रामाणिक व इच्छुक विद्यार्थी म्हणून आपण या वर्गात मला प्रवेश द्यावा आणि आपल्या 'अक्षर' साधनेत सहभागी करून घ्यावे ही नम्र विनंती.

कळावे,

आपला विश्वासू
अ.ब.क.
३, साधना,
बुधवार पेठ,

Sample Content

Page no. **161** to **204** are purposely left blank.

To see complete chapter buy **Target Notes & Target E - Notes**

Sample Content

# बोर्ड कृतिपत्रिका : मार्च 2023

## मराठी अक्षरभारती

**वेळ : 3 तास** **एकूण गुण : 80**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना : -**

(1) सूचनेनुसार आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील कृतींसाठी (सूचना, निवेदन), आकृतीची आवश्यकता नाही. तसेच, या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) विभाग 5 – उपयोजित लेखन प्र.5 (अ) (2) सारांशलेखन या घटकासाठी गद्य विभागातील प्र.1 (इ) अपठित उतारा वाचून त्या उताऱ्याचा सारांश लिहावयाचा आहे.

(5) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

### विभाग 1 : गद्य

**1. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** **[2]**

(i) पहाटे चार वाजता शेवटची गाडी इथून जाते.

(ii) निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठले.


(iii) स्टेशन इथून खूप दूर होतं.

(iv) पुलावरचे रूळ चांगल्या स्थितीत होते.

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल. निरंजन एकदम सावध झाला. गाडी आली, तर भयंकर अपघात होईल, हे त्याच्या लक्षात आलं. निरंजन नागरिकशास्त्राचा पेपर, देशमुखांकडचं जेवण सारं विसरला. त्याच्या डोळ्यांसमोर धाड्धाड् आवाज करत येणारी रेल्वेगाडी दिसू लागली. कानठळ्या बसवणारा आवाज आणि लोकांच्या किंकाळ्या कानांत घुमू लागल्या. स्टेशन इथून खूप दूर होतं. तीन-चार किलोमीटर तिथपर्यंत सांगायला जायचं, तर परीक्षा बुडणार होती. मग नापास. भडसावळे गुरुजींची मदत बंद. शिक्षणही बंद. रेल्वेने फिरायचं स्वप्न अपुरंच राहणार होतं; परंतु मन मानायला तयार नव्हतं. त्याने क्षणभर विचार केला आणि स्टेशनच्या दिशेने धाव घेतली. तो स्टेशनात शिरला तेव्हा नऊ पन्नासची गाडी नुकतीच आली होती. आता पाच मिनिटांतच ती सुटणार होती.

निरंजनने धावतच स्टेशनमास्तरांना गाठलं. त्यांना पुलावरच्या खराब झालेल्या रुळांबद्दल सांगितलं; पण ते त्यांना खरंच वाटेना. अखेर निरंजनने आर्जवं केली, की निदान पाहून आल्याशिवाय तरी गाडी सोडू नका. मी खोटं बोलत असेन, तर मला पोलिसांच्या ताब्यात द्या.

**(2) आकृतिबंध पूर्ण करा.** **[2]**




Sample content

**(3) स्वमत.** **[3]**

तुम्हांला अभिप्रेत असलेली आदर्श विद्यार्थ्यांची गुणवैशिष्ट्ये लिहा.

**(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) चौकटी पूर्ण करा.** **[2]**

(i) मावशींचे राहण्याचे ठिकाण –

(ii) मावशींना लेकाने दिलेली भेट –

(iii) झोपडीपुढे लावलेले झाड –

(iv) निळ्या तुकड्याच्या मधोमध उमटलेली –

"मावशी, तुम्ही राहता कुठं ?"
"त्या टेकडीपल्याड", मावशी म्हणाल्या.
"इथून किती कि. मी. आहे ?"
"तीन."
"तुम्ही कशा आलात इथपर्यंत ?"

"गेल्या मयन्यापतूर चालतच येत हुते; पन आता माझ्या लेकानं एक सायकल दिलीया मला. तवा आता सायकलनं येते", अशी अजून बरीच माहिती त्यानं भरली. आठवड्यातून सरासरी किती किलोमीटर फिरती होते ? ही फिरस्ती तुम्ही कशी करता ? आतापर्यंत किती झाडं तुम्ही लावली आहेत ?

रेखामावशी फिरायच्या पायीच, कधीतरी सायकलनं! त्यांच्या इवल्याशा झोपडीपुढंही त्यांनी दोन झाडं लावली होती. त्यांतलं एक लिंबोणीचं होतं; पण एवढी सगळी माहिती सुमित का घेतोय, तेच कुणाला कळेना. रेखामावशी तर फार गडबडून गेल्या. "आणि आता पाहा, या आहेत रेखामावशींच्या फूटप्रिन्टस्..........! असं म्हणत त्यानं मोबाइलचं कसलंसं बटन दाबलं आणि स्क्रीनवर पायपुसणीच्या आकाराचा एक निळा चौकोन उमटला, अगदी आभाळाच्या निरभ्र तुकड्यासारखा! सगळे 'आ' वासून पाहत होते आणि त्या निळ्या तुकड्याच्या मधोमध दोन पावलं उमटली ............ एकदम चंदेरी वर्खात मढलेली आणि खाली इंग्रजीत शब्द उमटले ............. 'सिल्व्हर फूटप्रिन्टस्! दि मोस्ट क्लिन फूटप्रिन्टस्!!'"

"वाऽ पाह्यलंत रेखामावशींचे पाय चंदेरी आहेत."

**(2) कोण ते लिहा.** **[2]**

(i) रेखामावशींची माहिती घेणारा –

(ii) चंदेरी पाय असलेल्या –

**(3) स्वमत.** **[3]**

'ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परिणाम' तुमच्या शब्दांत लिहा.

## अपठित गद्य

**(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.** **[2]**

**(1) आकृतिबंध पूर्ण करा.**

विनोबा यांच्या मते धडधाकट व अपात्राला दान केल्याने होणारे दुष्परिणाम

Sample Content

दारावर कुणी भिक्षा मागण्यास आला, तर आई त्याला भिक्षा घालत असे. एके दिवशी एक धडधाकट भिकारी आला असता रुक्मिणीबाई त्याला भिक्षा घालू लागल्या. विनोबा त्यांना म्हणाले, "हा तर धडधाकट दिसतो. अशा लोकांना जर भिक्षा देत गेलो, तर देशात आळस वाढेल. अपात्राला दान केले, तर त्यामुळे दान देणाऱ्याचेही अकल्याण होते."

रुक्मिणीबाईंनी ते शांतपणे ऐकले आणि म्हणाल्या, "विन्या, पात्र-अपात्र यांची परीक्षा करणारे आम्ही कोण? दारावर आलेला प्रत्येक माणूस परमेश्वररूप समजून त्याला शक्तिनुसार देत राहणे एवढे आपले काम आहे. त्याची परीक्षा करणारी मी कोण"? विनोबांनी त्यावर टिपणी केलीय, की 'आईच्या या युक्तिवादावर विन्याला दुसरा, युक्तिवाद सुचला नाही.'

**(2) जोड्या लावा.** **[2]**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (i) दारावर भिक्षा मागायला येणारा | (1) रुक्मिणीबाई |
| (ii) भिकाऱ्याला भिक्षा घालणाऱ्या | (2) विनोबा |
| (iii) आईच्या युक्तिवादावर टिपणी करणारे | (3) भिक्षेकरी |
| (iv) मुलाचे म्हणणे शांतपणे ऐकूण घेणाऱ्या | (4) रुक्मिणीबाई |

## विभाग 2 : पद्य

**2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(1) चौकटी पूर्ण करा.** **[2]**

(i) डोळे भरून पहावी अशी – [ ]

(ii) मुठीमध्ये नसलेले – [ ]

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडल्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;

Sample Content

तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी ;
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण ;
दीनदुबळ्यांचे असें
तुला एकच औक्षण.

**(2) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[2]**

(i) कष्टाचे सामर्थ्य अपुरे केव्हा वाटते ?

(ii) सैनिकाचे पाऊल जिद्दीचे का वाटते ?

**(3) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** **[2]**

(i) द्रव्य –

(ii) आसवे –

(iii) औक्षण –

(iv) कल्लोळ –

**(4)** 'सैनिक सीमेवर तैनात असतो म्हणून आपण सुरक्षित राहतो', या विधानातील भाव स्पष्ट करा. **[2]**

(आ) **खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.** **[8]**

| **मुद्दे** | **'दोन दिवस' किंवा 'स्वप्न करू साकार'** | | |
|---|---|---|---|
| (1) प्रस्तुत कवितेचे कवी / कवयित्री- | | | **[1]** |
| (2) प्रस्तुत कवितेचा विषय- | | | **[1]** |
| (3) प्रस्तुत कवितेतील दिलेल्या दोन ओळींचा सरळ अर्थ लिहा. | 'हे हात माझे सर्व दारिद्र्याकडे गहाणच राहिले.' | 'या देशाच्या मातीवरती अमुचा रे अधिकार नव्या पिढीचे, नव्या युगाचे स्वप्न करू साकार. ' | **[2]** |
| (4) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण | | | **[2]** |
| (5) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. | (i) जिंदगी –<br>(ii) बरबाद –<br>(iii) हरघडी –<br>(iv) दुनिया – | (i) ललकारणे –<br>(ii) नौबत –<br>(iii) विभव –<br>(iv) श्रम – | **[2]** |

Sample Content

## विभाग 3 : स्थूलवाचन

**3. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[6]**

(1) टीप लिहा – डॉ. होमी भाभा.

(2) सूर्य आणि पणती यांच्यातील संवाद स्वत:च्या कल्पनेने लिहा.

(3) टीप लिहा.

सग्वारो कॅक्टस

→ सग्वारो कॅक्टसचे दिसणे

→ सग्वारो कॅक्टसचे उपयोग

## विभाग 4 : भाषाभ्यास

**4. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(1) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **[2]**

(i) राष्ट्रगीताचा मान राखा.

(ii) हुशारीचे किती ते तेज त्याच्या चेहऱ्यावर!

**(2) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** **[2]**

(i) तो दररोज व्यायाम करतो. (प्रश्नार्थी करा.)

(ii) मन अशांत नव्हते. (होकारार्थी करा.)

**(3) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (फक्त दोन) :** **[4]**

(i) आर्जव करणे.

(ii) उत्साहाला उधाण येणे.

(iii) अंगाचा तिळपापड होणे.

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(1) शब्दसंपत्ती**

**(i) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[1]**

**शालीन** ........................., **आनंद** .........................

**(ii) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[1]**

खाजगी........................, चूक .............................

Sample Content

(iii) **वचन बदला.** [1]

बांगडी ......................., मित्र ...........................

(iv) **लिंग ओळखा.** [1]

डोंगर ......................., शिक्षिका ..........................

(2) **लेखननियमांनुसार लेखन** [2]

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.**

(i) इथले शीक्षक मनाने खुप श्रीमंत होते.

(ii) वाघीणीनं नाला पार करून बांबुच्या गंजीत पाय ठेवला.

(3) **विरामचिन्हे :** [2]

**खालील वाक्यांत योग्य विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा.**

(i) लाल हिरव्या बांगड्यांकडे त्याने कौतुकाने बघितले

(ii) आईने नाराजी व्यक्त केली पण उपयोग झाला का

## विभाग 5 – उपयोजित लेखन

5. (अ) **खालील कृती सोडवा.** [6]

(1) **पत्रलेखन**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

जनता विद्यालय
अहमदनगर
आयोजित
जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धा
दि. 2 जानेवारी वेळ स. 10.00 वाजता.
संपर्क-मुख्याध्यापक, जनता विद्यालय,
अहमदनगर.
E-mail-janatavidya02@gmail.com
मोबाइल- 0211556680

अभय/आर्या दळवी, विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने

स्पर्धेत सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.

**किंवा**

उत्तम आयोजनाबद्दल मुख्याध्यापकांना अभिनंदन करणारे पत्र लिहा.

Sample Content

किंवा

**(2) सारांशलेखन**

विभाग - 1 : गद्य (इ) (प्रश्न क्रमांक 1- इ) मधील अपठित गद्य उताऱ्याचा 1/3 एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.

(आ) **खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[10]**

**(1) जाहिरातलेखन**

पुढील विषयावर जाहिरात तयार करा.

योगासन वर्गाची आकर्षक जाहिरात तयार करा.

**(2) बातमीलेखन**

तुमच्या शाळेत 5 सप्टेंबर रोजी 'शिक्षक दिन' साजरा झाला. या कार्यक्रमाची बातमी लिहा.

**(3) कथालेखन**

खालील मुद्द्यांच्या आधारे कथा लिहा.

**मुद्दे :** अनाथ मुलगा – रोज सकाळी वर्तमानपत्राचे वाटप – दुपारी शाळेत – रस्त्यात एक पाकीट मिळते – वर्गशिक्षकांकडे देणे – पाकिटावरील पत्यावरून योग्य व्यक्तिपर्यंत पोहोचवणे – मालकाला आनंद – शाबासकी – मुलाला बक्षीस व त्याच्या शिक्षणाची जबाबदारी घेणे.

(इ) **लेखनकौशल्य :** खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. **[8]**

**(1) प्रसंगलेखन**

**अश्वमेध सभागृह**

– दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या –

– कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन –

दि. 15 डिसेंबर, वेळ- स. 10 ते रा. 8

प्रमुख पाहुणे – श्रीमती कला परांजपे

35 दिव्यांग व्यक्तिंनी तयार केलेल्या


वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती पाहण्याची संधी.

वरील प्रदर्शन पाहण्यासाठी तुम्ही गेला होतात, अशी कल्पना करून प्रसंगलेखन करा.

Sample Content

**(2) आत्मकथन**

चौकटीत दिलेल्या घटकाचे आत्मकथन लिहा.




**(3) वैचारिक**

'मानवी जीवनातील पाण्याचे महत्त्व', या विषयावर तुमचे विचार लिहा.

Sample Content

मार्च 2023 च्या बोर्ड कृतिपत्रिकेच्या उत्तरपत्रिकेकरता शेजारी दिलेला Q. R. Code *Quill - The Padhai App* द्वारे स्कॅन करा.

# AVAILABLE NOTES FOR STD. X:
(Eng., Mar. & Semi Eng. Medium)

## PERFECT SERIES
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- हिंदी लोकवाणी
- आमोद: सम्पूर्ण-संस्कृतम्
- आनन्द: संयुक्त-संस्कृतम्
- History and Political Science
- Geography
- Mathematics (Part - I)
- Mathematics (Part - II)
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)

## PRECISE SERIES
- Science and Technology (Part - 1)
- Science and Technology (Part - 2)
- History, Political Science and Geography

## PRECISE SERIES
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती
- इतिहास व राज्यशास्त्र
- भूगोल
- गणित (भाग - I)
- गणित (भाग - II)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - १)
- विज्ञान आणि तंत्रज्ञान (भाग - २)

## WORKBOOK
- English Kumarbharati
- मराठी अक्षरभारती
- हिंदी लोकभारती
- My English Coursebook
- मराठी कुमारभारती

## Additional Titles: (Eng., Mar. & Semi Eng. Med.)
- Grammar & Writing Skills Books (Std. X)
  • Marathi • Hindi • English
- Hindi Grammar Worksheets
- SSC 54 Question Papers & Activity Sheets With Solutions
- आमोद:(सम्पूर्ण-संस्कृतम्)
  SSC 11 Activity Sheets With Solutions
- हिंदी लोकवाणी (संयुक्त), संस्कृत-आनन्द: (संयुक्तम्)
  SSC 12 Activity Sheets With Solutions
- IQB (Important Question Bank)
- Mathematics Challenging Questions
- Geography Map & Graph Practice Book
- A Collection of Board Questions With Solutions




Scan the QR code to buy e-book version of Target's Notes on Quill - The Padhai App

**Visit Our Website**

**Target Publications® Pvt. Ltd.**
Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080
**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15
**Website:** www.targetpublications.org
**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of **STATIONERY**